# मच्छरी शेटजी खीर खातात


भा. रा. भागवत

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ४२५



BVBK-0400427

बा वा
नों. क्र. ४२८
शाखा.
विभाग.
क्र. 826
BVBK-0400427



# मच्छरी शेटजी खीर खातात

दोन हजार वर्षांपूर्वी आपला भारत देश खूप श्रीमंत होता. शेतकरी उत्तम धान्य पिकवीत, कोष्टी मागावर छानदार कापड विणीत. भांड्यांवर सुंदर नक्षीकाम करणारे कारागिर होते. कवी, गवई, चित्रकार, नट नर्तक यांना दरबारात मान असे.

त्या काळी काशिनगर भारतात फार प्रसिद्ध होतं. आजच्या मुंबईइतके प्रसिद्ध. आजदेखील काशी आहेच. गंगेच्या काठावरचे देवळांनी गजबजलेले पवित्र शहर. जन्मात एकदा तरी काशीयात्रा करावी असे प्रत्येकाला वाटतं. त्याकाळी तर काशी म्हणजे एका मोठ्या

राज्याची राजधानी होती. शहरातले रस्ते रुंद असत. त्यांवर गुलाबपाणी शिंपडलेले असे. दोन्ही बाजूंना उंच नि भव्य वाडे असत. मधूनमधून देवळांचे सोनेरी कळस दिसत.


शहरात मोठा बाजार भरे. दूर देशाचे व्यापारी तिथे येत. मोठी देवाणघेवाण चाले. लोक छानदार कपडे नि दागिने घालून हिंडत. फळाफुलांची रेलचेल असे. बायकांप्रमाणे पुरुषांनाही फुले आवडत. कुणाच्या गळ्यात हार तर कुणाच्या हातात गजरा असे.

शहरात गाण्याबजावण्याचे मधुर स्वर ऐकू येत. अत्तर उदबत्त्यांचा सुगंध सुटलेला असे. अशा त्या श्रीमंत काशीनगराचा एक खजीनदार होता. खजीनदार म्हणजे फार मोठा अधिकारी. सगळ्या सरकारी तिजोऱ्या त्याच्या ताब्यात असत. त्याला प्रचंड पगार होता आणि शिवाय त्याने कुठेतरी पुरून ठेवले होते—ऐंशी कोटी रुपये!

"बाप रे!" तुम्ही म्हणाल, "म्हणजे चांगलाच श्रीमंत होता की तो! खूपच डामडौलात राहात असेल. त्याचा बंगला म्हणजे राजवाडाच असेल!"

अहो, कसला बंगला नि कसला राजवाडा! तीच तर मोठी गंमत आहे.

तो खजीनदार म्हणजे पक्का कंजूष माणूस होता. कंजूष म्हणजे लोभी किंवा चिक्कू. असा चिक्कू माणूस साऱ्या जगात दुसरा झाला नसेल. हजारो कुटुंबे पोसण्याइतकी संपत्ती त्याच्याजवळ होती. पण तो कुणाला दिडकी देत नसे आणि स्वतःसाठी पण चिकटपणाने खर्च करी. त्यामुळे लोकांनी त्याला नाव दिले होते — मच्छरी कोशीय. म्हणजे कोट्याधीश चिक्कूमामा.



या मच्छरीशेटची राहणी सांगितली तर तुम्हांला हसू कोसळेल. तो राहात असे एका लहानशा खोपटात. खोपटही जूनेपाने मोडकळीस आलेले होते. जमीन खडबडीत, भिंतीना पोपडे अन् छपराला सतरा जागी फटी पडलेल्या. त्या फटीतून पावसाळ्यात पाणी गळे, अन् आयतीच बसल्याबसल्या आंघोळ होई. उन्हाळ्यात घरी बसल्याबसल्या सूर्यस्नान घडे.

घरात सामान फार थोडे होते. मोडक्या खाटा. फुटकी भांडी नि फाटकी पांघरूणं. मच्छरी शेटजीचे जेवण म्हणजे कोंड्याचा भात अन् वाटीभर सांबार — काय म्हणता? अधूनमधून एखादा लाडू, एखादी जिलेबी? छे हो! नाव कशाला? खरं म्हणजे त्या काळी साखर भरपूर मिळत असे. पण साखरेवर खर्च करावा कुणी?

मच्छरीशेट अंगात जाडेभरडे कपडे घाली. तो महिन्यातून एकदाच दाढी करी....हां न्हाव्याला पैसे कुणी द्यावेत?

या बाबाची एक गाडी होती. ती त्याच्याच सारखी मोडकळीस आलेली. करकर वाजणारी. तिला तो दोन बैल जुंपी. बैल कसले? बैलाची भुते होती ती! खंगलेले, खप्पड, सदा आजारी नि रडतोंडे बैल!

या गाडीतसुद्धा तो नेहमी बसत नसे. फार लांब जायचे तरच गाडीतून जाई. एरवी पायीच हिंडे. डोक्यावर माडाच्या झावळ्यांची एक गावठी छत्री घ्यायचा, अन् पायात केळफुलांच्या सालींचे जोडे घालायचा.

मच्छरीशेट फार मोठा अंमलदार. त्याच्या हाताखाली पुष्कळ लोक काम करीत. याच्या

चालेल. मी ते सगळं घेऊन रानात दूर कुठेतरी एकटाच जाईन. खीर करीन आणि ती खाईन."

आणि त्या पठ्ठ्याने खरोखर तसे केले. ते सगळे सामान घेऊन तो दूर रानात गेला. आसपास कोणी नाही अशी त्याने खात्री करून घेतली. तीन दगड मांडले. काटक्याकुटक्या जमवल्या. जाळ केला. चुलीवर भांडे ठेवले.

त्याची खीर शिजत आहे तोच एक साधू तिथे आला आणि हात वर करून म्हणाला, "जय रामजीकी! भगवान तुझं कल्याण करील बेटा! एवढी खीर शिजवली आहेस तर मला दे की थोडी! भूक सपाटून लागली आहे. आणि पाहुण्याला कधी तसाच परत पाठवू नये हे तुला माहित आहेच."

मच्छरी दचकला. त्याला वाटले, अरेच्या! इथे पण आपल्या खिरीला वाटेकरी निघालाच की! पहिल्याने त्याने त्याच्याकडे लक्षच दिले नाही. त्याच्याकडे पाठ फिरवून तो खीर ढवळू लागला.

पण साधू होता लोचट. त्याने आपली बडबड चालूच ठेवली. तेव्हा शेवटी मच्छरी त्रासून म्हणाला, "बरं तर! जा एक पान घेऊन ये!"

साधूने केळीचे एक भले मोठे पान तोडून आणले. मच्छरीने रागाने त्याच्याकडे पाहिले. तो ओरडला, "एवढं मोठं पान! इथे काय जेवणावळ आहे, होय?" आणि दोन्ही हातांनी त्याने ते पान टरदिशी फाडून टाकले. "जा–लहान पान घेऊन ये!"



साधू गेला. त्याने कर्दळीचे पान आणले. पण मच्छरीने तेही फाडून टाकले.

साधू पुन्हा गेला. त्याने पिंपळाचे पान आणले. मच्छरीने तेही टर्रर्र. साधूने वडाचे पान आणले. ..टर्रर्र. आंब्याचे पान आणले—टर्रर्र.

शेवटी साधूने बोराचे पान आणले. ते चिमुकले पान मच्छरीला पसंत पडले.

मग त्याने मोजून सात थेंब खीर बोराच्या पानावर वाढली.

दोघांचे जेवण सुरू झाले.

लपक्—लपक्—लपक्—

साधूने सातही थेंब तेव्हाच चाटून टाकले. तो जिभल्या चाटत म्हणाला, "फारच छान झालीय बुवा ही खीर ! आणखी थोडी देतोस का ?"

साधूच्या बोलण्याने मच्छरीशेट चमकला. त्याला नवल वाटले. त्याला आनंदही वाटला. तो म्हणाला, "खरंच छान झाली म्हणता ?—हं, घ्या—"

आणि त्याच्या हाताने आपसूक आणखीही थोडी खीर साधूला वाढली. आणि मग आणखी थोडी—मग आणखी थोडी—आणखी थोडी.

मच्छरीशेटजी पुन्हा पुन्हा साधूला खीर वाढीत होता आणि तो ती मटकावून पुन्हा पुन्हा मागत होता.

असे कितीतरी वेळा चालले. दोघांनी मिळून पोटभर खीर खाल्ली आणि दोघेही आनंदाने शहराकडे परतले.

आणि घरी पोहोचल्याबरोबर मच्छरी दौतलेखणी घेऊन बायकोला म्हणाला, " चल, यादी करायला बस या. "

" यादी ? "

" वाण्याकडून सामान आणायचं, त्याची यादी ! तू म्हणालीस ते पटलं मला. आपण उद्या गाव जेवण देणार–खिरीचं गाव जेवण ! "

हे ऐकून बायकोने भला मोठा आ पसरला. जसे काही तिच्याच तोंडात कोणी खीर घालीत होते !

तेव्हापासून मच्छरी पार बदलून गेला. चिक्कूपणाची राहणी त्याने टाकून दिली. त्याने खूप मित्र जोडले. आपल्याजवळचा पैसा तो गरिबांसाठी खर्चू लागला. लोक म्हणू लागले. " वाहवा ! मच्छरीशेटसारखा उदार माणूस नाही. आपल्या गावाचं माणिक आहे ते माणिक ! "



म. ग्रं. सं., वा...
दा. क्र. 824
[redacted]
BVBK-0100427

## आवडत्या कथा :

१ *सशाची फजिती* **( शंभर पैसे )**

२ *कोल्होबाची चंगळ* **( पन्नास पैसे )**

३ *झाडाला जेव्हा पैसे लागतात* **( शंभर पैसे )**

४ *खाशी जिरली वाघोबाची !* **( शंभर पैसे )**

५ *जादूची पिशवी* **( पन्नास पैसे )**

६ *शेपटी अर्धी, त्यात दिवाळीची गर्दी !* **( पन्नास पैसे )**

७ *कोल्होबा जिंकले कोल्होबा हरले !* **( पन्नास पैसे )**

८ *पारिजातक* **( पन्नास पैसे )**

९ *मच्छरी शेटजी खीर खातात* **( पन्नास पैसे )**

१० *पराक्रमी इटकु पिटकु* **( पन्नास पैसे )**

११ *इटकु पिटकूची सहल* **( पन्नास पैसे )**

१२ *मनी हरवली, मनी सापडली !* **( शंभर पैसे )**